2020-21
M.V. Hiray

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

E-ISSN – 2348-7143

Impact Factor – 6.625

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar.
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet- Covid 19-Vaccination (Hon. Prime Minister of India Narendra Modi & Hon. President of U.S.A. Joe Biden)

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari [M.S.]
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | आदिवासी लोकगीतातील स्त्रीवास्तव | प्रा.राजू शनवार | 05 |
| 02 | दशावतार : एक लोककला | डॉ. अंजली मस्करेन्हस | 09 |
| 03 | तडवी समाज आणि संस्कृती | डॉ. धनराज धनगर | 15 |
| 04 | आंध्र प्रदेशातील विठ्ठल भक्तीचे स्वरूप | डॉ.प्रभाकर घोडके | 24 |
| 05 | देवदासी प्रथा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा | डॉ.गजानन भामरे | 29 |
| 06 | तुकारामाची कविता - एक चिंतन | डॉ. निशा जोशी | 32 |
| 07 | रामदासांचे 'मनाचे श्लोक' : एक विश्लेषणात्मक चिंतन | प्रा. अमृता डोर्लीकर | 37 |
| 08 | ओवीगीतातील आई | डॉ. अनिता सोनवणे | 42 |
| 09 | राष्ट्रसंताच्या अभंग गाथेतील विविध देवता | डॉ. प्रवीण कारंजकर | 46 |
| 10 | उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणारी श्रेष्ठ कादंबरी 'बळी' | डॉ. रेखा वडिखाये | 51 |
| 11 | अण्णाभाऊ साठेंच्या महाराष्ट्र संसकृतीची यशोगाथा गौरवणाऱ्या पद्यरचना | प्रा. सोमनाथ पावडे | 57 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या जमातींचे लोकजीवन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 61 |
| 13 | साठोत्तरी मराठी कवितेतील महानगरी आशयसूत्रे | डॉ. भरतकुमार भालेराव | 64 |
| 14 | ग्रामीण कादंबरीतील बदलते ग्रामवास्तव | डॉ. वाल्मिक आढावे | 71 |
| 15 | 'अजूनही बरंच काही बाकी' - दिनकर मनवर यांची कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश वर्धे | 76 |
| 16 | मायबापाच्या जीवनाची व्यक्त झालेली विचार माल : 'सूर्याची मशाल बाप माझा' | डॉ. प्रमोद गारोडे | 85 |
| 17 | डॉ. दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन | प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. सुरेश जाधव | 91 |
| 18 | 'हरवलेली माणसं' निघालीत माणुसकीच्या शोधात ! | डॉ. मारोती घुगे | 95 |
| 19 | आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीच्या लोकसंस्कृतीचा आविष्कार | प्रा. विनायक राऊत, डॉ. कांचन नलवडे | 102 |
| 20 | युवकांना आत्मबळ देणारा ग्रंथ : कर हर मैदान फतेह | डॉ. भाऊसाहेब गमे | 107 |
| 21 | भगतसिंग यांचे धार्मिक विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 113 |
| 22 | भुसावळ तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग | डॉ. जगन्नाथ गोपाळ | 118 |
| 23 | १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील सरकारी केंद्रावरील हल्ले | डॉ. भानुदास शिंदे | 123 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांची कल्याणकारी राजकीय व्यवस्था | डॉ. देविदास नरवाडे | 126 |
| 25 | आधुनिक संदर्भात महात्मा गांधी यांच्या श्रमविषयक विचारांची उपयुक्तता | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वाचन अभिरुची व ग्रंथसंपदा | डॉ. प्रशांत पगाडे | 134 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' आणि 'सामाजिक न्याय' विचार | डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 138 |
| 28 | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची प्रस्तावना | डॉ.सुनिल पिंपळे | 149 |
| 29 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य : एक चिंतन | प्रा. सुनिलदत्त गोडसे | 153 |
| 30 | महिला सशक्तीकरण धोरणाचा आढावा | डॉ. चांगदेव मुंढे | 156 |

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग : विशेष संदर्भ कर्जत तालुका | डॉ. चंद्रकांत गोंधळी | 162 |
| 32 | मराठवाड्यातील महिला समुपदेशन केंद्रांची महिला तक्रार निवारणातील भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. श्रीमती इंदू साळुंखे | 170 |
| 33 | ओतारी समाजातील स्त्रीचे स्थान | प्रा. विक्रम ओतारी | 175 |
| 34 | लोणारी समाजातील विधवा महिलांच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास | डॉ. संजय शिंदे | 178 |
| 35 | कोरोना काळात मोलकरणींच्या कुटुंबियांवर झालेल्या परिणामांचे अध्ययन | डॉ. नारायण गाढे | 189 |
| 36 | शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य- एक दृष्टिक्षेप | डॉ. अनिल वाघ | 193 |
| 37 | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा चिकित्सक अभ्यास | प्रीती दीक्षित, प्रा. ए. आर. मुंगी, प्रा. ए. वाय. दीक्षित | 199 |
| 38 | भारतातील राजकीय गुन्हेगारीकरण : एक अभ्यास | प्रा. ए. पी. वनारसे | 206 |
| 39 | गायत्री शक्तीपिठाच्या नवरात्री उत्सवातील मंत्रसाधना- वैज्ञानिक दृष्टी | डॉ. रजनी लुंगसे | 210 |
| 40 | बँकांचे विलीनीकरण धोरणाचा चिकित्सक अभ्यास | डॉ. नीता वाणी | 215 |
| 41 | स्वामीनाथन आयोगाचे अवलोकन | डॉ. एस. पी. देवरे | 220 |
| 42 | केंद्रीय कृषी योजना : सिंहावलोकन | डॉ. एम. व्ही. हिरे | 224 |
| 43 | प्रधानमंत्री मुद्रा योजना - अवलोकन | डॉ. आर. के. जाधव | 228 |
| 44 | मुलभूत सुविधा आणि कृषी विकास | डॉ. बी. एम. सोनवणे | 232 |
| 45 | ग्रामीण विकासात लोकांच्या सहभागाची आव्हाने | डॉ. मारुती केकाणे | 236 |
| 46 | टाळेबंदी (लॉक डाऊन) नंतरची ग्रामीण अर्थव्यवस्था - विशेष अभ्यास | डॉ.सुरेश ढाके | 244 |
| 47 | भारतीय नवीन कृषी धोरण २०२० : एक दृष्टिक्षेप | डॉ. गोरखनाथ वाकळे | 249 |
| 48 | नवीन कृषी धोरण (कायदे) २०२० : संधी आणि समस्या | प्रा. देवानंद मंडवधरे | 254 |
| 49 | राष्ट्रीय कृषी धोरण २०२० : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुक्टे | 259 |
| 50 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्यांच्या दर्जाचा अभ्यास | श्रीनिवास पाटील | 265 |
| 51 | व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे महत्त्व | डॉ. मनिष देवरे | 272 |
| 52 | विना साहित्य व्यायामाचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायूंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम | विशाल गायकवाड, आदित्य कुलकर्णी | 276 |
| 53 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील हँडबॉल खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्य यातील सहसंबंधाचा अभ्यास | श्रीनिवास पाटील | 279 |
| 54 | भगतसिंग यांचे युवकांच्या संबंधीचे विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 285 |
| 55 | आधुनिक ज्ञानयुगाचा सारथी : शिक्षक | श्री.विपीन वैराट | 289 |
| 56 | उच्च शिक्षणात माहिती व तंत्रज्ञानाचे महत्त्व | डॉ. अनमोल शेंडे | 295 |
| 57 | विधीसंघर्षग्रस्त मुलांची प्रवृत्ती | डॉ. अशोक सातपुते | 300 |
| 58 | राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि आप्तवाक्य : एक तात्विक विश्लेषण | डॉ.राजेसाहेब मारडकर | 304 |
| 59 | गावडी बोलीचो व्याकरणीक आनी भासविज्ञानीक नदरेंतल्यान अभ्यास | दिपराज सातोर्डेकार | 311 |

# केंद्रिय कृषी योजना : सिंहावलोकन

डॉ. एम. व्ही. हिरे
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
म. स. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.
Mail Id : mvhiray@gmail.com

प्रस्तावना :—

भारतात प्राचीन काळापासून उपजीविकेसाठी शेती केली जाते आहे. शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला गेलेला आहे. कारण भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ५५ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर विसंबून आहे. भारतातील उद्योग व सेवा क्षेत्रावर देखील शेती क्षेत्राचा प्रभाव पडतो. शेती क्षेत्रात विविध आदानाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जातो त्यासाठी सेवा क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्रातील सेवा व वस्तूंना मोठया प्रमाणात मागणी ही शेती क्षेत्राकडून केली जाते. शेती हे मानवाला निसर्गाने दिलेले एक वरदानच म्हणवे लागेल. कारण शेतीक्षेत्र हे मनुष्याला निसर्गाकडून भेट स्वरूपात मिळालेले आहे. मानवी प्रयत्नांनी शेतीक्षेत्र कृत्रिमरित्या वाढविता येत नाही. म्हणून शेती क्षेत्र हे मानवासाठी वरदान ठरते आहे. ब्रिटिश कालावधीत भारतीय शेतीक्षेत्राची आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट झाली. ग्रामीण भागातील बारा बलुतेदार त्यांचा पारंपारिक व्यवसाय मोडकळीस आल्यामुळे हवालदिल झालेले होती. त्यांच्यावर जमीनदारांकडे 'कुळ' म्हणून काम करण्याची वेळ ओढवली मात्र "ब्रिटिशांची महसुल जमा करण्याची महालवारी, रयतवारी सारख्या जाचक पध्दतीमुळे कुळांचे आणि शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात शोषण करण्यात आले."[१] शेतातील अन्नधान्य हे चरितार्थ चालवण्यासाठी देखील पुरेसे नसल्यामुळे शेतात नवीन सुधारणा करणे शक्य झाले नाही. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी हा नेहमीच जमीनदार आणि सावकार यांच्या कर्जजाळयातच अडकून पडला म्हणून भारतातील शेती हे शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी फारशी उपयुक्त ठरली नाही.

स्वातंत्र्यांनंतर भारतात शेतीक्षेत्राच्या विकासावर अधिक लक्ष देण्यात आले. भारताने आर्थिक नियोजनाचा मार्ग स्विकारला. पंचवार्षिक योजना तयार करून विकास परियोजनांचा प्राधान्यक्रम निश्चित केला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रात उत्पादन वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व्यापक स्वरूपात प्रयत्न करण्यात आले. याअंतर्गत सिंचन प्रकल्प निर्माण करण्यात आले. शेतीला कृत्रीम पाणीपुरवठा करण्यावर अधिक भर देण्यात आला. यामुळे शेती विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण भारतात प्रारंभी उद्योगधंदयांचा फारसा विकास झाला नसल्यामुळे शेतीक्षेत्रांवर वाढत्या लोकसंख्येचे प्राबल्य कमी होऊ शकले नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी भारतात शेती उत्पादन वाढविण्यासाठी 'हरितक्रांती' करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले गेले. या अनुषंगाने सुधारित बी–बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके व पाणी देण्याच्या सुधारित तंत्राचा वापर करण्यात आल्यामुळे काही ठराविक राज्यात अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली मात्र ही हरितक्रांती सर्वच राज्यात यशस्वी झाली नाही व केवळ विशिष्ट पिकांच्या बाबतीतच हरितक्रांतीला यश लाभले. "विद्यमान केंद्र शासनाने २०१४ पासून 'सबका साथ सबका विकास' अशी घोषणा करून सर्वच क्षेत्रांचा सर्वसमावेश विकास करण्याचे धोरण स्विकारले."[२] असे सरकारने आजपर्यंत जे विविध उपाय योजले आहेत त्यावरून स्पष्ट होते.

प्रस्तुत संशोधन लेखात केंद्र शासनाने शेतीक्षेत्रांच्या व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी जे प्रयत्न केले आहेत त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन निबंधाची उद्दिष्टे :–**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे निश्चित केलेली आहेत.

१) केंद्र शासनाच्या 'सबका साथ सबका विकास' अंतर्गत शेती व शेतकऱ्यांच्या विकासासंदर्भत कोणते उपाय योजले त्यांची माहिती अभ्यासणे.

२) शासनाने शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी केलेल्या खर्चाचा आढावा घेणे.

३) ग्रामीण भागातील विकास योजनांचा शेतीक्षेत्राला कसा लाभ झाला यासंबंधी माहिती अभ्यासणे.

**संशोधन प्रणाली :–**

प्रस्तुत शोध निबंधाच्या निर्मितीसाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर केलेला आहे. त्यासाठी पूर्वप्रकाशित सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने शसकीय संकेतस्थळे, इतर अधिकृत संकेत स्थळे, संदर्भ ग्रंथ यातील प्रकाशित माहितीचा उपयोग केलेला आहे. तसेच प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी 'अर्थशास्त्रीय विश्लेषण तंत्राचा' वापर केलेला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :–**

केंद्र शासनाने भारतातील शेतकरी आणि शेती क्षेत्राची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी व्यापक स्वरूपात विकासाची रणनीती आखण्यात आली. कारण भारतात गेल्या दोन दशकापासून वेगाने औद्योगिकरणाची प्रक्रिया घडून येत आहे. तसेच सेवाक्षेत्राचाही विस्तार होतो आहे. यामुळे मोठया प्रमाणात जमीनींचे अधिग्रहाण करण्याचे काम चालू आहे. पूर्वी ज्या जमीनीत विविध पिकांचे उत्पादन घेतले जात होते त्या जमीनी आता उद्योजकांकडे उद्योगधंद्यांच्या निर्मितीसाठी वापरल्या जात आहेत. यामुळे भारतात भविष्यात वाढत्या लोकसंख्येला भिषण अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊ शकते. यासाठी शासनस्तरावरून शेतीच्या विकासाच्या मुख्य हेतूने विकास परियोजनांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी केली जाते आहे.

निवडक शेती विकासाच्या योजनांचा आढावा पुढील प्रमाणे –

**अ) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना :–**

देशातील शेतजमीनी अधिकाधिक प्रमाणात सिंचनाखाली आणण्याच्या हेतूने विद्यमान सरकारने "सन २०१५ पासून कृषी सिंचन योजना सुरू केली आहे."[३] अन्नधान्य उत्पादनासाठी शेती अधिक महत्वपूर्ण आहे. सिंचनाच्या सुविधा शेतीक्षेत्राला उपलब्ध असल्यास शेतीक्षेत्रात विविध पिकांच्या उत्पादनात भरीव वाढ होत असते. याचे महत्व शासनाने ओळखून या योजनेची अंमलबजावणी केंद्रिय पातळीवरून करण्याचे धोरण निश्चित केले. भारत एक कृषीप्रधान देश आहे. भारतातील सर्व शेतकरी शेतीक्षेत्रावर विसंबून आहेत. मात्र पुरेशा सिंचन सुविधेच्या अभवामुळे बहुतांश जमीनी या रब्बी हंगामात पडीक असतात. यासाठी केंद्र शासन प्रत्येक अर्थसंकल्पात कृषी सिंचन योजनेच्या विस्तारीकरणासाठी विशिष्ट निधीची तरतुद करीत असते. "२०२१ च्या अर्थसंकल्पात केंद्र शासनाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या विस्तारीकरणासाठी ५०,००० को. रूपये खर्च करण्याचे निश्चित केले आहे."[४]

**आ) प्रधानमंत्री पीक विमा योजना :–**

भारतातील शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्यामुळे १९८५ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशात सर्वप्रथम पीक विमा योजना सुरू केली. त्यानंतर १९९९ मध्ये एन. डी.ए. सरकारने 'राष्ट्रीय कृषी विमा योजना' नव्याने सुरू केली. या योजनेच्या माध्यमाने नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात आले तसेच शेतातील सर्व

प्रकारच्या पिकांना या योजनेत समाविष्ठ करण्यात आले. "आता विद्यमान केंद्र शासनाने १३ जानेवारी २०१६ रोजी "'प्रधानमंत्री पीक विमा योजना' या नावाने नव्या स्वरूपात ही योजना कार्यान्वीत केली आहे."[५] या योजनेची काही मुख्य वैशिष्टये होती – १) शेती क्षेत्रावर नैसर्गिक आपत्ती, किटक आणि रोगराई यामुळे पिकांना नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे. २) शेतात नवीन व आधुनिक शेतीपध्दतीचा स्वीकार करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे. ३) शेती क्षेत्राला पित्तपुरवठा करणे ज्यामुळे अन्नसुरक्षा वाढेल, पीक पध्दतीत बदल होईल, कृषी क्षेत्रात स्पर्धात्मकता येऊन कृषी तंत्राची वाढ होईल. या योजनेत अत्यल्प दरात शेतकऱ्यांना पिक विम्याचे संरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

**इ) प्रधानमंत्री शेतकरी सम्मान योजना :–**

"केंद्र सरकारने २०१९ मध्ये अर्थसंकल्प संसदेत सादर करताना तत्कालीन अर्थमंत्री पीयुष गोयल यांनी १ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रधानमंत्री शेतकरी सम्मान निधी योजनेची घोषणा केली."[६] यासाठी २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी या योजनेत शेतकऱ्यांना वितरीत करण्यासाठी ७५००० कोटी रू. येवढी तरतुद केली. शेतकरी सम्मान निधी योजनेच्या माध्यमाने शेतकऱ्यांना त्यांच्या बॅंक खात्यामध्ये वर्षामधून तीन वेळेला दोन:दोन हजार याप्रमाणे एकूण ६००० रूप्ये देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना रोख पैशाच्या स्वरूपात धनराशी देण्यामागे शासनाचा हेतू असा आहे की, शेतकऱ्यांना कृषी हंगामापुर्वी व हंगामादरम्यानशेतात पिक घेण्यासाठी आर्थिक मदत होईल या प्रमाणे शासनाने ही शेतकऱ्यांच्या व्यापक हिताची योजना कार्यान्वीत केलेली आहे. या ोजनेसाठी केंद्र शासनाने आर्थिक वर्षे २०२१–२२ साठी ६५००० को. रू. येवढया रकमेची तरतुद केलेली आहे.

**ई) मृदा (माती) आरोग्य पत्रिका योजना :–**

"भारत सरकारने फेब्रुवारी २०१५ मध्ये मृदा आरोग्य पत्रिका योजना सुरू केली."[७] या योजनेचा शुभारंभ राजस्थान पासून करण्यात आला. या योजने अंतर्गत शासनाने शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिका देण्याचे निश्चित केले आहे. या योजनेच्या माध्यमाने शेतकऱ्यांना पीकांनुसार शिफारशी, आवश्यक पोषक तत्वे व त्या शेतीनुसार आवश्यक असणारे खते या संबंधीची माहिती दिली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना मातीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत होईल व जमीनीचे आरोग्य सांभाळले जाईल. अशी महत्वकांक्षी योजना केंद्रशासनाने सुरू केलेली आहे.

**निष्कर्ष :–**

केंद्र शासनाने शेती क्षेत्राचा आणि शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने शेतीच्या विविध योजनांची आखणी केलेली आहे. भारतात परिस्थितीनुसार केंद्र शासनाने वेळोवेळी नवीन शेती विकासाच्या योजना सुरू केलेल्या आहेत. तर काही योजनांचे समायोजन केलेले आहे. या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला तर त्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल अशी धारणा शासनाची आहे. शेतकरी आत्मनिर्भर झाल्यास शेतात नवनविन तंत्राचा वापर करणे शक्य होईल आणि शेती व शेतकरी विकासाच्या मुख्य प्रवाहात येणे सहज शक्य होइल पण आपल्या देशात केंद्रीय योजना व राज्य सरकारी योजना यांच्यात फारसा समन्वय दिसून येत नाही. म्हणून शेतकरी गोधळलेल्या स्थितीत राहतो व याचा परिणाम असा होतो की, शेतकरी व्यापक हितापासून वंचीत राहतो. हे येथै स्पष्ट होते.

**संदर्भ :–**

१. संकेत स्थळ :– mr.m.wikipedia.org, Date 10/03/2021
२. संकेत स्थळ :– blog.mygov.in Date 10/03/2021

३. संकेत स्थळ :– pmksy.gov.in Date 12/03/2021
४. संकेत स्थळ :– pmmodiyojana.in Date 12/03/2021
५. संकेत स्थळ :– mr.m.wikipedia.org, Date 13/03/2021
६. संकेत स्थळ :– en.m.wikipedia.org, Date 15/03/2021
७. संकेत स्थळ :– mr.vikaspedia.in Date 15/03/2021